नि.फौ.ख.क्र. ७७९/२०२२
सरकार वि. राजु
नि.क्र. ११ चा भाग

साक्षीदार क्र **०४** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–मोहम्मद सिराज अंसारी
वय:–३५ वर्ष, व्यवसाय–पंचर दुकान
राह.बेला, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समन्सपत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही नाही, त्यातील मजकुर मला माहीती नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८/०६/२०२२ रोजी पोलिसांनी मला मौजा बेला येथे घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समन्सपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दिवशी घटनास्थळावर गेलो व माझ्यासमक्ष अपघाताबाबत घटनास्थळ पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड. पि. एच. रघुते यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि. ३०.१०.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड